दै. गोदातीर दि. 06/06/2024

# १३ मोबाईलसह चोरट्यास अटक; वजिराबाद गुन्हे शोध पथकाची कारवाई

**नांदेड–** मागील काही दिवसात मोबाईल चोरीच्या घटनात कमालीची वाढ झाल्यानंतर पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी गुन्हे शाखेला या गुन्ह्याची उकल करण्याचे निर्देश दिले होते. त्यानंतर गुन्हे शोध पथकाने अभिलेखावर गुन्हेगारांच्या हालचालीवर लक्ष ठेवून एकास अटक केली. त्याच्याकडून चोरलेले १३ मोबाईल जप्त करण्यात आले. अरुण रामदास श्रीमंगले असे आरोपीचे नाव आहे.

मागील काही दिवसात बसस्थानक व रेल्वेस्टेशन परीसरामधून मोबाईल फोन चोरीस / गहाळ होत असल्याबाबतच्या तक्रार येत होत्या. त्यामुळे सहाय्यक पोलीस अधीक्षक किरितिका सी. एम. व वजिराबाद पोलीस ठाण्याचे निरीक्षक परमेश्वर कदम यांच्या



मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाचे अधिकारी राजु वटाणे, हवालदार दत्तराम जाधव, मनोज परदेशी, शरदचंद्र चावरे, शेख ईम्रान शेख एजाज, बालाजी कदम, रमेश सुर्यवंशी, भाऊसाहेब राठोड, मेघराज पुरी हे मोबाईल चोरट्यांचा शोध घेणेकामी अभिलेखवरील गुन्हेगारांच्या हालचालीवर लक्ष ठेऊन होते.

दि. ४ जून रोजी चौधरी पेट्रोलपंपाचे बाजुस तारा पान शॉप समोर उभा असलेल्या इसमाला मोबाईल फोन विक्री करतांना ताब्यात घेतले. त्याची अधिक चौकशी केली असता त्याच्याकडून १३ मोबाईल जप्त करण्यात आले. नाव अरुण रामदास श्रीमंगले, (वय ३६ वर्षे, व्यवसाय हेअरकटींग सलुन रा. जागृत हनुमान मंदीर, काबरानगर, नांदेड ता.जि. नांदेड असे त्याचे नाव आहे. पुढील अधिक चौकशीसाठी पोहेकॉ मनोज परदेशी यांच्याकडे त्याला स्वाधीन करण्यात आले.

... अनेक प्रश्न समोर येत आहेत.